पोलीस अधीक्षक , कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

---

# प्रेसनोट क्र. ४२ दिनांक १४/०८/२०२२

# “स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव” अनुषंगाने पालघर पोलीस दलाकडून १० कि.मी. अमृतमहोत्सवी दौडचे आयोजन

भारताचा ७५ वा स्वातंत्र्य दिनानिमित्त **“स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव”** या उपक्रमांतर्गत भारताचा राष्ट्रीय ध्वजाचा सन्मान वाढविण्यासाठी दि.१३ ऑगस्ट २०२२ ते दि.१५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत **“घरोघरी तिरंगा”** हा कार्यक्रम राबविण्याचे शासनाचे निर्देश झाले आहेत.

त्या अनुषंगाने श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांचे निर्देशान्वये पालघर पोलीस दलातर्फे दि.१४/०८/२०२२ रोजी सकाळी ०६.०० वाजता पोलीस अधीक्षक कार्यालय, मोरेकुरण रोड, जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर येथून १० कि.मी. **“अमृतमहोत्सवी दौडचे”** आयोजन करण्यात आले होते. सदर अमृतमहोत्सवी दौडमध्ये मा.श्री. गोविंद बोडके, जिल्हाधिकारी पालघर, मा.श्री. सिध्दाराम सालीमठ, मुख्य कार्यकारी अधिकारी पालघर, श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक पालघर तसेच पालघर जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व अंमलदार हे सहभागी झाले होते. सदरची दौड ही पोलीस अधीक्षक कार्यालय येथून चाररस्ता ते पालघर रेल्वे स्टेशन ते माहिम वळण नाका व परत चाररस्ता मार्गे पोलीस अधीक्षक कार्यालय येथे समाप्त करण्यात आली. सदर स्पर्धेमध्ये शासकीय अधिकारी व अंमलदार, शाळेतील विद्यार्थी, एनस.सी.सी. विद्यार्थी, नागरीक असे एकूण ७०० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता.

सदर १० कि.मी. दौडमध्ये खालीलप्रमाणे स्पर्धक विजयी झाले आहेत.

**१) प्रथम ३ आलेले सर्वसाधारण गटातील पुरुष :-**

i) अभिषेक चंद्रकांत पागधरे, रा. शिरगाव, ता. जि. पालघर

ii) सचिन रामा गोविंद, रा. विक्रमगड, ता विक्रमगड, जि. पालघर

iii) उमेशसिंह नरसिंह राजपुत, रा. शिरगाव, ता. जि. पालघर

**२) प्रथम ३ आलेल्या सर्वसाधारण गटातील महिला:-**

i) रोहिणी माया पाटील, रा. विरार, ता. वसई, जि. पालघर (डि.एम. स्पोर्टस्)

ii) अर्चना नरेश खुताडे, रा. पालघर, ता. जि. पालघर

iii) मोनाली माळी रा. विक्रमगड, जि. पालघर

**३) प्रथम ३ आलेले शासकीय पुरुष उमेदवार :-**

i) पोशि/१४७० परेश सुरजितसिंह मेस्त्री नेम. घोलवड पोलीस ठाणे

ii) पोशि/३६ पंकज रडका कानल, नेम. पोलीस मुख्यालय

iii) पोशि/११७८ सचिन दबडे, नेम. पोलीस मुख्यालय

**४) प्रथम ३ आलेल्या शासकीय महिला उमेदवार :-**

i) कुमारी रिंकी महंती नेम. होमगार्ड

ii) मपोशि/२५०४ ज्योती जाधव, नेम. जिल्हा विशेष शाखा

iii) मपोउपनि/पुनम सुर्यवंशी, नेम. जव्हार पोलीस ठाणे

**५) १२ वर्षाखालील प्रथम ३ आलेल्या शालेय उमेदवार :-**

i) कु. सुशांत श्रीमंत सांगळे, आनंदाश्रम विद्यालय पालघर

ii) कुमारी. शार्वी उपेंद्र मोरे, आनंदाश्रम विद्यालय पालघर

iii) कुमारी श्रव्या मंगेश मोहिते, आनंदाश्रम विद्यालय पालघर

सदर दौडमध्ये मा.श्री. गोविंद बोडके, जिल्हाधिकारी पालघर, मा.श्री. सिध्दाराम सालीमठ, मुख्य कार्यकारी अधिकारी पालघर, श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक पालघर यांच्यासह सर्व शासकीय अधिकारी व अंमलदार तसेच नागरीक यांनी सहभाग घेऊन १० कि.मी. दौड स्पर्धा यशस्वीपणे पुर्ण केली. तसेच वरील मान्यवरांच्या शुभहस्ते विजयी झालेल्या स्पर्धकांना प्रमाणपत्र व गौरवचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

सदरचा कार्यक्रम हा श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक पालघर, श्रीमती निता पाडवी, उपविभागीय पोलीस अधिकारी पालघर, श्री शैलेश काळे, पोलीस उप अधीक्षक (गृह) पालघर तसेच पालघर जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांच्या सहभागाने यशस्वीरित्या पार पडला.